सकाळ

# तब्बल चार लाख कोटींची गुजरातमध्ये गुंतवणूक निश्चित

महेश शहा / सकाळ न्यूज नेटवर्क
अहमदाबाद, ता. १३ - गुजरात हे देशातील सर्वाधिक गुंतवणूकदारांना आकर्षित करणारे देशातील सध्याचे आघाडीचे राज्य आहे काय, या प्रश्नाचे होकारार्थी उत्तर दिले आहे, व्हायब्रंट गुजरात- २००७ या परिषदेने! या परिषदेच्या पहिल्याच दिवशी देश-विदेशातील उद्योजकांनी राज्यात तब्बल चार लाख कोटींची गुंतवणूक करण्याचे प्रस्ताव दिल्याचे आज स्पष्ट झाले. ......
यातील रिलायन्स उद्योगाचे मुकेश अंबानी यांचा सर्वाधिक ६७ हजार कोटींच्या गुंतवणुकीचा प्रस्ताव आहे.

अपेक्षित चार लाखांपैकी दोन ते अडीच लाख कोटींच्या गुंतवणूक प्रस्तावांचे प्रत्यक्ष करारही झाले आहेत. येथील सायन्स सिटीमध्ये सुरू झालेल्या या जागतिक गुंतवणूकदारांच्या परिषदेत अंबानी यांचे बंधू अनिल, रतन टाटा, कुमारमंगलम् बिर्ला, 'आयसीआयसीआय' बॅंकचे के. व्ही. कामत, एस्सारचे शशी रूईया, 'ओएनजीसी'चे आर. एस. शर्मा, संघवी ग्रुपचे रवी संघवी, रेमंडचे सिंघानिया, 'वोकहार्ट'चे हबील खोरकीवाला आदी देशातील झाडून सारे आघाडीचे उद्योजक सध्या गुजरातमध्ये आले आहेत. परिषदेच्या पहिल्याच दिवसाच्या अखेरीला खासगी क्षेत्रातून ३.५४ लाख कोटींचे व सरकारी क्षेत्रातून अडीच लाख कोटींहून अधिक गुंतवणुकीचे प्रस्ताव आल्याने परिषदेचे मुख्य संयोजक, मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह सहकाऱ्यांना मकरसंक्रांतीची गोड भेटच मिळाल्याचे मानले जाते. राज्य सरकारने 'एसईझेड' व अन्य क्षेत्रांत गुंतवणुकीसाठी सर्व प्रकारच्या सवलतींचा लाल गालिचा अंथरल्याचा हा परिणाम असल्याचे मानले जाते.